MHND06-000724-2019

**विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०१९**
मेघा विरुध्द चंद्रशेखर व इतर

**निशाणी क्र.५४ वरील आदेश**
(दिनांक ०८.०७.२०२०)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ७ विरुध्द पोलीस मदत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन आहे की, प्रस्तुतचे दाव्यात तिच्या हक्कात प्रतिवादी क्र. ७ विरुध्द तात्पूरता मनाई हुकूम मंजूर झालेला आहे. असे असतांना प्रतिवादी क्र. ७ ही सदरील आदेशाचा भंग करुन वाद मिळकतीत तिच्या ताब्यास हरकत व अडथळा करत आहे. तसेच प्रतिवादी क्र. ७ ने वाद मिळकतीतील सोयाबीनचे पिक ट्रॅक्टरच्या साह्याने मोडून टाकण्याची धमकी दिलेली आहे. त्यामुळे तिला भिती आहे की, प्रतिवादी क्र. ७ तिच्या ताब्यास अडथळा करील. त्यामुळे तिने प्रस्तुतचा अर्ज हा तिच्या ताब्यास प्रतिवादी क्र. ७ ने अडथळा करु नये म्हणून पोलीस मदत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी अर्ज मंजूर करण्याची विनंती करते.

३. प्रतिवादी क्र. ७ हिने सदरील अर्जास तिचे म्हणणे (निशाणी क्र.५९) दाखल केले. तिने अर्जातील प्रतिकूल कथने नाकारली. तिने कथन केले की, वादी ही तळणी येथे राहत नसून, वाद मिळकतीची वहीती करत नाही. तिने प्रतिवादी क्र. २ च्या मदतीने वाद मिळकतीची वहीती केलेली आहे. तसेच प्रतिवादीचे कथन आहे की, तिने मनाई हुकूमाचा कोणत्याही प्रकारे भंग केलेला नाही. तसेच तिने वादीच्या ताब्यास अडथळा केलेला नाही. प्रतिवादीने कथन केले की, वादीचा अर्ज मंजूर झाल्यास वादी न्यायालयाच्या मनाई हुकूमाचा दुरुपयोग करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादीच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला की, वाद मिळकतीवर वादीचा ताबा असल्याची बाब प्रतिवादीने दाखल केलेल्या नियमित दिवाणी दावा क्र.१३२/२०१९

मध्ये मान्य केलेली आहे. तसेच प्रतिवादीविरुध्द पोलीस स्टेशनला अर्ज देखील देण्यात आलेले आहेत. सबब, वादीच्या ताब्यास अडथळा करु नये म्हणून प्रतिवादी क्र. ७ विरुध्द वादीस पोलीस मदत देण्यात यावी. वादीने तिच्या म्हणण्या पुष्टयर्थ मा. उच्च न्यायालयाच्या **रत्नाबाई नारायणराव नाईक व इतर विरुध्द सटवाराव नारायणराव नाईक (1994 CJ(Bom) 508)** या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. प्रतिवादीच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला की, वाद मिळकतीवर प्रतिवादीचा ताबा नाही. प्रतिवादीने दाखल केलेल्या दाव्यामध्ये वाद मिळकती संदर्भात दरम्यानचे उत्पन्न मिळण्याची मागणी केलेली आहे. प्रतिवादीने मनाई हुकूमाचा भंग केलेला नाही. तिच्या दाव्यातील विनंती पाहता तिला वादीच्या ताब्यास हरकत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकले. मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त न्यायनिर्णयात परिच्छेद क्र. ८ मध्ये असे म्हटले आहे की, *"Thus, the special procedure for police help would not be allowed unless there are reasonable grounds to suppose that the execution will not be effected without serious danger to public peace, because of apprehension of violence or obstruction from the judgment-debtor himself or because of the conditions of general character as such where the execution will have to be done in disturbed stage or a class of people similarly situated being likely to make common cause that the judgment-debtor can resist the execution. Besides this, in addition the circumstances enumerated above to grant police help the Court must be fully convinced of the existing of grave emergency and to prevent commission of cognizable offence by the judgment-debtor or on his behalf by any persons or a third party."*

६. वादी व प्रतिवादी यांच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने निशाणी क्र. ६२ वरील यादी नुसार दाखल कागदपत्रे पाहिली. असे दिसते की, दाव्यातील प्रतिवादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. ७ विरुध्द पोलीस स्टेशनला दिलेल्या अर्जावरुन प्रतिवादी क्र. ७ विरुध्द तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालयात चॅप्टर केस दाखल करण्यात आली. तसेच नियमित दिवाणी दावा क्र. १३२/२०१९ ची निशाणी क्र. १ ची प्रत पाहता असे दिसते की, त्यामध्ये या दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ ने दरम्यानचे उत्पन्न मिळण्याची मागणी केलेली आहे. म्हणजेच वाद मिळकतीवर प्रतिवादी क्र. ७ चा ताबा नाही ही बाब तिला देखील मान्य आहे. वाद मिळकतीत सोयाबीन पिकाची पेरणी केल्याचे वादीने अर्जात कथन केले आहे.

तिला पोलीस मदत ही तिच्या ताब्यास प्रतिवादी क्र. ७ ने अडथळा करु नये म्हणून पाहिजे आहे. मला वाटते की जर खरोखरीच प्रतिवादी क्र. ७ ने वादीच्या ताब्यास अडथळा केल्याचे कृत्य केले असेल तर तिने मनाई हुकूमाच्या भंगा बाबत न्यायालयात कार्यवाही दाखल करणे अपेक्षीत आहे. तिला वाद मिळकतीतील पिक काढणे असल्याची अथवा वाद मिळकतीत बियाणे पेरण्याची बाब तिच्या अर्जाद्वारे न्यायालयासमोर आलेली नाही. सबब, पोलीस मदत किती दिवसांकरीता व कोणत्या कामासाठी द्यावी हा प्रश्न उपस्थित होतो. वादी ही तळणी येथे राहत नाही. ती कोणत्या दिवशी, कोणत्या कार्यासाठी वाद मिळकतीत जाणार हे अर्जात नमूद नाही. केवळ ताब्यास हरकत अडथळा करु नये म्हणून पोलीस मदत देण्याचे कारण दिसत नाही, कारण अडथळा कधी होईल हे निश्चित नाही. कोणत्या विशिष्ट कारणासाठी पोलीस मदत मागितलेली नाही. पूर्वीच उल्लेखल्याप्रमाणे वादीस मनाई हुकूमाच्या कथित भंगाबाबत कार्यवाही करण्याचा अधिकार आहे. सबब, उपरोक्त सर्व परिस्थिती पाहता मी या निष्कर्षाप्रत आलेलो आहे की, अर्जातील बाबी पाहता वादी ही पोलीस मदत मिळण्यास पात्र ठरत नाही, तशी परिस्थिती अर्जातून दिसत नाही. सबब, उपरोक्त न्यायनिर्णयातील निकष येथे लागू पडत नाहीत. सबब, अर्ज नामंजूर होण्यास पात्र ठरतो. सबब, खालील आदेश –

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Nilesh Subhash Budruk
Date: 2020.07.08 13:56:43 +0530

**(नीलेश सु. बुद्रुक)**

दिनांकः ०८.०७.२०२० दिवाणी न्यायाधीश व.स्तर,

बिलोली.